महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
Website : www.ropune.org.in

४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११०१६.

जा.क्र. : तंशिविकापु/विवि/महाडीबीटी२०२४-२५/१००% शिक्षण शुल्क/२०२४/ 3305 दिनांक : १३.०८.२०२४

13 AUG 2024

**परिपत्रक:**

प्रति,
संचालक / प्राचार्य,
शासकीय, अशासकीय अनुदानित व खागजी विनाअनुदानित
पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था,
पुणे विभाग.

**विषय : व्यावसायिक अभ्यासक्रमांस शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून प्रवेश घेतलेल्या व याआधी प्रवेशित मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या १०० टक्के लाभ शासनामार्फत देण्यात येणार असूनही, शैक्षणिक संस्थांकडून मुलींना प्रवेशावेळी सदर शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची रक्कम भरण्यास सक्ती करण्यात येत असलेल्या विद्यार्थीनींच्या तक्रारीबाबत..**

संदर्भ :
१) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शा.निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४ दिनांक ०७ ऑक्टोबर, २०१७.
२) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शा.निर्णय क्र. शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.१०५/तांशि-४ दिनांक ०८ जुलै, २०२४.
३) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.२०७/तांशि-४ दिनांक १९ जुलै, २०२४.
४) तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/विकाप/२०२४-२५/३११ दिनांक २३ जुलै, २०२४.
५) या विभागीय कार्यालयाचे परिपत्रक क्र. तंशिविकापु/विवि/महाडीबीटी२०२४-२५/१००%शिक्षण शुल्क/२०२४/२९६८ दिनांक २२ जुलै, २०२४.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून निर्गमित झालेल्या संदर्भ क्रमांक १ मधील शासन निर्णयान्वये राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतने / सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणा-या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमास, शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणा-या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (Centralized Admission Process - CAP) (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी, ज्या मुलींच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्ट्या मागास (EBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), इतर मागास प्रवर्ग (OBC), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC) प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) मुलींना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागांकडून सध्या देण्यात येणा-या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभा ऐवजी १०० टक्के लाभ देण्यास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून शासन मान्यता देण्यात आली आहे.

तसेच, संदर्भ क्रमांक ३ मधील शासन परिपत्रकान्वये आर्थिकदृष्ट्या मागास (EBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), इतर मागास प्रवर्ग (OBC), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC), प्रवर्गातील पात्र विद्यार्थी व विद्यार्थीनींकडून प्रवेशाच्यावेळी शिक्षण शुल्काची रक्कम न घेणेबाबतचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

संदर्भ क्रमांक ५ मधील या विभागीय कार्यालयाचे परिपत्रक नुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून, मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या १०० टक्के लाभ शासनामार्फत देण्यात येणार असून, संदर्भ क्रमांक ३ च्या शासन परिपत्रकानुसार आर्थिकदृष्ट्या मागास (EBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), इतर मागास प्रवर्ग (OBC), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC), प्रवर्गातील पात्र विद्यार्थी व विद्यार्थीनींकडून प्रवेशाच्यावेळी शिक्षण शुल्काची रक्कम न घेणेबाबतचे सूचना देण्यात आलेल्या आहेत. **तरीही उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, या विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील काही शैक्षणिक संस्थांकडून मुलींना शैक्षणिक शुल्काची रक्कम भरणेबाबत सक्ती करण्यात येत आहे.**

याबाबत मुलींना शासनास किंवा तंत्रशिक्षण संचालनालयास तक्रार करणेकरिता संचालनालयाच्या संकेतस्थळावर खालील मदत दूरध्वनी क्रमांक व मदतकक्ष तिकीट लिंक उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

**Helpline Numbers -- 7969134440 / 7969134441**

**Helpline desk Ticket Link -- helpdesk.maharashtracet.org**

याअनुषंगाने विद्यार्थीनींकडून शैक्षणिक शुल्काची रक्कम भरण्यास सक्ती करणा-या या विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील संस्थांना व इतर सर्व संस्थांना या विभागीय कार्यालयाकडून भेट देण्यात येणार आहे. सदर भेटीदरम्यान संस्थेने विद्यार्थीनींकडून शैक्षणिक शुल्क घेतले असल्याचे निदर्शनास आल्यास आपल्या संस्थेविरुध्द कडक कारवाई करणेसाठी संचालनालयाकडे शिफारस करण्यात येईल याची सर्व संस्थांनी नोंद घ्यावी.

सदर परिपत्रक संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर तसेच दर्शनी सूचना फलकावर प्रसारीत करुन आपल्या संस्थेतील सर्व विद्यार्थीनींच्या निदर्शनास आणून द्यावे.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत :
१. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई (कार्यासन क्र. २, १० व १८) यांना माहितीस्तव सादर.
२. कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजीकल युनिर्व्हसीटी, लोणेरे.
३. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
४. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
५. कुलसचिव, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
६. कुलसचिव, सीओईपी टेक्नॉलॉजीकल युनिर्व्हसीटी, पुणे.